# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. १९/०५/२०११

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा गुरुवार दिनांक १९/०५/२०११ रोजी सभा सुचना क्र. ०३ दि. १२/०५/२०११ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लालबहाद्दुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा | सभापती |
| २. | श्री. दिनेश दगडु नलावडे | सदस्य |
| ३. | श्री. चंद्रकांत भि. मोदी | सदस्य |
| ४. | श्री. चंद्रकांत खंडोजी म्हात्रे | सदस्य |
| ५. | श्रीम. सुधा वासुदेव व्यास | सदस्या |
| ६. | श्रीम. निर्मला बा. सावळे | सदस्या |
| ७. | श्रीम. कॅटलीन परेरा | सदस्या |
| ८. | श्री. राजेश म्हात्रे | सदस्य |
| ९. | श्री. लक्ष्मण जंगम | सदस्य |
| १०. | श्री. भगवती तु. शर्मा | सदस्य |
| ११. | श्री. शशिकांत भोईर | सदस्य |
| १२. | श्रीम. मुसर्रतबानो शेख | सदस्या |
| १३. | श्रीम. स्नेहा शैलेश पांडे | सदस्या |
| १४. | श्री. मोहन गोपाळ म्हात्रे | सदस्य |

**गैरहजर सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. मोहन जाधव | सदस्य |
| २. | श्री. रामनारायण दुबे | सदस्य |

**मा. सभापती :-**

सचिव साहेब, सभेच्या कामकाजाला सुरुवात करा.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा गुरुवार दि. १९/०५/२०११ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०३, दि. १२/०५/२०११ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र.१८, दि. ०७/०९/२०१० व दि. २१/०९/२०१० (दि. १८/०९/२०१०) रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**स्नेहा पांडे :-**

पेज नं.६ पर ठराव क्र.५२ उसमे रेट वगैरे कुछ दिया नही है? क्या रेट से दिया था?

**नगरसचिव :-**

ठराव ऐसा ही हुआ था।

**स्नेहा पांडे :-**

रेट अमाऊंट कुछ भी कितने साल के

**नगरसचिव :-**

ठराव जैसा ही था वैसा ही हमने वही दिया है।

**स्नेहा पांडे :-**

ठराव मे रेट नही है?

**नगरसचिव :-**

हमारे पास जो ठराव दिया था उसमे रेट नही है। आपको ठराव भी देखनी मिलेगा।

**शशिकांत भोईर :-**

पान क्र.८ वर अनिल सावंत यांच वक्तव्य आहे याच्यात ६ वी लाईन आहे. ती फार भयानक परिस्थीती आहे. हे वाक्य २ वेळा आलेलं आहे तर ते दुरुस्त करुन घ्या तसेच पान क्र.९ वर मा. आयुक्त साहेबांचं वक्तव्य आहे यांनी अंध, अपंग, गटई कामगार, टेलिफोन बुथ तर तिथे बुथ हे वाक्य पाहीजे. मा.

सभापती यामध्ये ५४ नंबरचा ठराव झाला होता. तर त्याच्यामध्ये बुथ दिलेले आहेत आपण त्याच्यामध्ये ४ x ६ ची साईज आहे तर ६ x ४ ची आहे तरी कुठे कुठे जास्त आहेत तरी प्रशासनाने त्याच्यावर काय कार्यवाही केलेली आहे. त्याबद्दल माहिती मिळाली तरी बरे होईल साहेब, त्यांना द्यावं साहेब. पण साईज आहे ना साहेब साईजच्या अनुषंगाने चालल तर आम्हाला........

**मा. नगरसचिव :-**

दुसरं प्रकरण २१/९ चं पान नं.१ ते ३२ एक सावंत म्हणून नाव आलेले होतं तिथ नाव सावळे आहे.

**शशिकांत भोईर :-**

१५ नंबर आहे त्यामध्ये महापौरांचा स्वेच्छानिधी आणि सहाय्यता निधी ठेवणार होतो त्यात एक अकाऊंट करायचं होतं.

**मा. आयुक्त सो. :-**

सचिव साहेब, तुम्ही धर्मादायुक्ताकडे रजिस्ट्रेशन केलं की नाही.

**शशिकांत भोईर :-**

केलं की नाही त्याच एप्लीमेंट काय?

**मा. आयुक्त सो. :-**

रजिस्ट्रेशन झाल्यानंतर फंडाचा विचार करु.

**शशिकांत भोईर :-**

फंडाचा विचार करु साहेब, पण केलं नाही ना स्थायी समितीची सभा सप्टेंबरची होती ना.

**मा. आयुक्त सो. :-**

रजिस्ट्रेशन लवकर करुन घ्या. मग आम्ही फंड भरतो.

**भगवती शर्मा :-**

दि. ०७/०९/२०१० व दि. २१/०९/२०१० (दि. १८/०९/२०१०) रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, ६ नंबरचा ठराव झाला होता. आपण मशिनरी आणणार होतो. नगरसेवक निधी किंवा प्रभाग निधीचा वापर करुन जो कचरा येतो. कचऱ्यातुन आपण खत निर्मिती करण्याचा प्रकल्पातून कोणत्यातरी कंपनीने मशिन काढलेली आहे. त्याला अनिल सावंत ने ठराव केला होता. तर त्याची प्रोसिजर काय झाली? आपण कुठेतरी मशिन लावली का?

**मा. आयुक्त :-**

प्रभाग निधीमधुन करा म्हणून असं कोणाचं पत्र आलेलं नाही.

**शशिकांत भोईर :-**

६२ नंबरचा ठराव झालेला त्याच्यामध्ये नगरसेवक निधी आणि प्रभाग निधी वापरु शकतो.

**मा. आयुक्त :-**

पण त्या सभासदांचा स्वेच्छा निर्णय आहे ना त्यांनी पत्र द्यायला पाहिजे माझा फंड वापरा म्हणून.

**शशिकांत भोईर :-**

बरोबर आहे. त्यासाठी कोणती मशिनरी लागली?

**मा. आयुक्त :-**

इनामदार साहेब मुंबईला बघून आले. आम्ही काय पाहिलेलं नाही पण पत्र आल्यानंतर आम्ही तिकडे विचार करु. कोणी नगरसेवक निधी, प्रभाग निधी देतो म्हटले तर आम्ही बघुन येऊन तुम्हाला माहिती देऊन सुरु करु. कारण मिरा भाईंदर महापालिका सिटी मधले घनकचरा व्यवस्थापन २००० कायद्याप्रमाणे तिकडे आमचं प्रोसेस चालू आहे. जर ते बंद पडलं तर ह्याचा विचार करु ना. समजा, आपलं शिफ्टींग झालं वर्सोवाला गव्हर्नमेंट ने मंजूरी दिली तर ते ही तिथेच प्रोसेस चालू आहे. जी गोष्ट झालेली आहे त्यासाठी परत खर्च कशाला करायचं आता तुम्ही मा. महासभेमध्ये जाहीर केलं की, घनकचरा व्यवस्थापन रि-सायकलींग, सौर उर्जा आणि पाण्याचं हे सगळं सोसायटीत कोणी करत असेल त्यांना सुट द्यायचं चालल आहे. पेपरला जाहीरात देऊन टाका की, असं असं सुट दिलेली आहे, असे जाहीर प्रसिध्द करु कराना.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, आपण नविन परवानगी देणार ना तर त्यांना पण बंधन घालायचं की, तुम्हाला स्वतःची बसवायला लागेल. आपण तुमचं प्लान मंजूर करतो.

**मा. आयुक्त :-**

बंधन घालायचं म्हणजे स्टँडींग वाईज नॉमिनल घालता येतं. पण, डी.सी. रुलमध्ये आपण कसं केलं सौर, नंतर पाण्याचं डी.सी. रुलमधुन बदल करुन आणलं. आता हे जर डी.सी. रुलमध्ये नविन परवानगीमध्ये घातलं तर ते डी.सी. रुल मध्ये बदल करायचं. आता घालायचं तर आम्ही घालुन टाकु. पण डी.सी. रुल मध्ये बदल केल्याशिवाय कुठलीही अट घालता येत नाही.

**भगवती शर्मा :-**

साहब, सन्मा. सदस्य अनिल सावंत साो. ने जो ठराव किया था। इसका कोई डेमो बताया था क्या की, यह मशिन सक्सेस है, क्या है क्या नही है?

**मा. आयुक्त :-**

डेमो नही बताया था।

**भगवती शर्मा :-**

मैने जहाँतक यह सुना था की, यह कही दौरे पर गये थे। वहाँ पे उन्होने एक चीज दिखाया। प्रॅक्टीकली मैने जहाँतक देखा यक प्लान सक्सेस भी नही है।

**मा. आयुक्त :-**

उन्होंने क्या बोला था की, उसको बुलाके लाता हूँ। डेमो दिखाता हूँ, बादमे डिसीजन लेंगे। डेमो दिखाने के लिए उनको बुलाया नही है। उनकी टेक्नॉलॉजी अच्छी होगी तो इम्प्लिमेंट करेंगे।

**शशिकांत भोईर :-**

नविन संकुलनासाठी त्यांनी त्या प्रोजेक्ट मध्ये द्यावा असं दिलेलं होतं.

**मा. आयुक्त :-**

तुमच्या मिटींग होतात ना तेव्हा तुम्ही मार्गदर्शन करुन त्यांना पत्र द्यायला लावा म्हणजे आपण इंजिनिअर करु.

**शशिकांत भोईर :-**

नविन बिल्डींग ची जी परवानगी देतो. त्या बिल्डरला अनिवार्य करावा असं त्यांनी.........

**मा. आयुक्त :-**

अनिर्वाह करायचं असेल तर गव्हर्नमेंटची मंजुरी लागेल ३६ खालील मायनर मोडीफिकेशन खाली डी.सी. रुलमध्ये चेंज करायला लागेल.

**भगवती शर्मा :-**

डी.सी. रुलमध्ये परिवर्तन करायला आपल्याला अधिकार नाही ठराव केला त्याप्रमाणे पण आपल्याला अधिकार नाही.

**मा. आयुक्त :-**

मा. महासभेत ठराव घ्या. बदल करा मग ठरवा आणि तुमच्या ज्यावेळेला मिटींग होतात त्यावेळी प्रभाग निधी, नगरसेवक निधी देऊन करा म्हणून असं पत्र दिलं तर लगेच आपण त्यांना बोलवून घेऊ.

**प्रकरण क्र. १८ :-**

दि. ०७/०९/२०१० व दि. २१/०९/२०१० (दि. १८/०९/२०१०) रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. १८ :-**

दि. ०७/०९/२०१० व दि. २१/०९/२०१० (दि. १८/०९/२०१०) रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदक :- श्री. लक्ष्मण जंगम**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र १९, निविदांना मंजुरी मिळणेबाबत. (सार्व. बांधकाम विभाग)

**भगवती शर्मा :-**

दि.०९/०२/२०११ रोजीच्या दै. आपल महानगर व दै. दि फ्री प्रेस जर्नल या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आलेल्या विषयांकित जाहीर निविदा सुचनेनूसार व ई-टेंडरींग नूसार प्राप्त निविदा दि.१८/०२/२०११ रोजी उघडण्यात आल्या आहेत. त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

डोंगरी पंपिंग स्टेशन येथे नविन पंप पुरविणे, बसविणे व कार्यान्वित करणे.
(अंदाजित रक्कम रु. २३,९९,२०१/-)

| **ठेकेदाराचे नाव** | **देकार** |
|---|---|
| मे. ॲकॉर्ड मार्केटींग ॲन्ड सर्व्हिसेस | २.७०% ज्यादा वाटाघाटी अंती ०.५०% कमी |
| मे. साईविणा एंटरप्राईजेस | ५.२९% ज्यादा |
| मे. ग्रॅव्हीटी इंजिनिअरींग वर्क्स | ६.७८% ज्यादा |

उपरोक्त कामाचा तुलनात्मक तक्ता पाहता वरील कामाकरीता मे. ॲकॉर्ड मार्केटींग अँन्ड सर्व्हिसेस यांचे दर लघुत्तम आहेत. सबब उपरोक्त लघुत्तम दर वाजवी व रास्त असल्याने सदर निविदा मंजूरीस व याकामी वेळोवेळी येणारी देयके मंजूर करणेस मा. स्थायी समिती सभा मंजूरी देत आहे.

**शशिकांत भोईर :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे. परंतु, जी मशिनरी आता लावलेली आहे. त्याची परिस्थीती काय आहे?

**शिवाजी बारकुंड :-**

ही मशिनरी १५ वर्षापुर्वीचं बसवलेली त्याची लाईफ पण संपलेली आहे आणि एफिसिएन्सी पण देत नाही. त्याची कार्यक्षमता एकदम घटलेली आहे त्यामुळे बसवणं आवश्यक आहे.

**शशिकांत भोईर :-**

आपली जी मशिनरी आहे. त्यावेळी ५ लाख रुपयांची १० लाख रुपयांची होती. आता ती भंगार मध्ये काढणार तर कसं काय?

**शिवाजी बारकुंड :-**

आपण स्टँडबाय म्हणून ठेवतो. आता नविन बसवणार म्हणजे जूना पंप बाजूला काढुन ठेवणार तो आपल्याजवळ ठेवणार. एमरजन्सी पिरीएड मध्ये कधी लागला तर त्याचा दुसरा स्टँडबाय आपल्याकडे नाही स्टँडबाय म्हणून ठेवणार.

**शशिकांत भोईर :-**

आजपर्यंत आपण कुठले-कुठले पंप बदली केले?

**शिवाजी बारकुंड :-**

हे डोंगरीचं आहे ना कारण आपण डोंगरीचा पंप बदललाच नाही.

**शशिकांत भोईर :-**

दुस-या कुठे ठिकाणी पंप चेंज केले की हा पहिला आहे?

**शिवाजी बारकुंड :-**

ज्या-ज्या ठिकाणी आपल्याला लागतं. सध्या डोंगरीचा आहे. तर डोंगरीचाच प्रपोजल घेतलेला आहे. स्पेसिफिक कुठला आहे तो विचारा ना.

**शशिकांत भोईर :-**

माझा प्रश्न असा आहे की, गोडदेवच्या टाकीवर होता का?

**शिवाजी बारकुंड :-**

गोडदेवचं नव्हतं.

**शशिकांत भोईर :-**

फाटकावर होतं त्याच काय झालं?

**शिवाजी बारकुंड :-**

तिथला विषयचं नाही.

**शशिकांत भोईर :-**

औषध लागलीच नाही, फक्त डोंगरीचच आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

हो, डोगरीचचं आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

११ नंबर की टाकीपर पंप बंद था वह चालू किया की नही?

**शिवाजी बारकुंड :-**

चालू है।

**चंद्रकांत म्हात्रे :-**

साहेब, शास्त्री नगरला पंप बसवला होता तो किती दिवसापासून बंद आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

चालू आहे. आपण बघायला जातो ना बारीकसारीक किरकोळ होतात.

**मा. सभापती :-**

पुढचा विषय घेण्यात यावा.

**प्रकरण क्र.१९ :-**

निविदांना मंजुरी मिळणेबाबत. (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. १९ :-**

दि.०९/०२/२०११ रोजीच्या दै. आपल महानगर व दै. दि फ्री प्रेस जर्नल या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आलेल्या विषयांकित जाहीर निविदा सुचनेनूसार व ई-टेंडरींग नूसार प्राप्त निविदा दि.१८/०२/२०११ रोजी उघडण्यात आल्या आहेत. त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

डोंगरी पंपिंग स्टेशन येथे नविन पंप पुरविणे, बसविणे व कार्यान्वित करणे.
(अंदाजित रक्कम रु. २३,९९,२०१/-)

| **ठेकेदाराचे नाव** | **देकार** |
|---|---|
| मे. ॲकॉर्ड मार्केटींग ॲन्ड सर्व्हिसेस | २.७०% ज्यादा वाटाघाटी अंती ०.५०% कमी |
| मे. साईविणा एंटरप्राईजेस | ५.२९% ज्यादा |
| मे. ग्रॅव्हीटी इंजिनिअरींग वर्क्स | ६.७८% ज्यादा |

उपरोक्त कामाचा तुलनात्मक तक्ता पाहता वरील कामाकरीता मे. ॲकॉर्ड मार्केटींग ॲन्ड सर्व्हिसेस यांचे दर लघुत्तम आहेत. सबब उपरोक्त लघुत्तम दर वाजवी व रास्त असल्याने सदर निविदा मंजूरीस व याकामी वेळोवेळी येणारी देयके मंजूर करणेस मा. स्थायी समिती सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदक :- श्री. शशिकांत भोईर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र.२०, भाईंदर (प.) रेल्वे स्टेशन जवळ, स्काय वॉक खाली दुचाकी वाहनांचे वाहनतळ ठेका पध्दतीने चालविणे कामी निविदा मंजुर करणे.

**भगवती शर्मा :-**

मा. सभापती साहेब, इसमे जो निविदा दि थी वह १ ही निविदा आयी है और किसीकी आयी नही है।

**मा. आयुक्त :-**

किती वेळा प्रसिध्दीकरण केलं?

**भगवती शर्मा :-**

पहिल्यांदाचं केलं. त्यासाठी परत एकदा करावे असे आमचा ठराव आहे.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, अनुभव अटीशर्ती काय होत्या ते जरा प्रशासनाने सांगितलं तर बर होईल.

**मा. आयुक्त :-**

जागा आम्ही देणार आणि पार्किंग करणारे पार्किंग करतात त्यात काय अनुभव पाहिजे.

**शशिकांत भोईर :-**

त्यांनी अट घातली नसेल म्हणून ते आले नसणार. मी आता विचारणा केली. आपण ती अनुभवाची अट टाकले. त्याला अनुभवाची अट कशाला पाहिजे? माणूस शाळेतच गेला नाही तर शिकणार कसा?

**लक्ष्मण जंगम :-**

जाहिरात देता ना कुठल्या अटी टाकलेल्या.

**मा. आयुक्त :-**

ठिक आहे आपण फेर टेंडर काढु.

**लक्ष्मण जंगम :-**

परत, तसच काढलं तर तसच झालं तर?

**मा. आयुक्त :-**

अट कट करुन काढु ना.

**मा. सभापती :-**

ठिक आहे. फेरनिविदा काढा.

**प्रकरण क्र. २० :-**

भाईंदर (प.) रेल्वे स्टेशन जवळ, स्काय वॉक खाली दुचाकी वाहनांचे वाहनतळ ठेका पध्दतीने चालविणे कामी निविदा मंजुर करणे.

**ठराव क्र. २० :-**

मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रात, भाईंदर (पश्चिम ) येथे रेल्वे स्टेशन जवळ, स्काय वॉक खाली दुचाकी वाहनांचे वाहनतळ ठेका पध्दतीने ३ वर्षे मुदतीकरिता चालविणेबाबत दि. १६/०२/२०११ रोजीच्या दै. लोकमत, दै. नवभारत, दै. फ्रि प्रेस जर्नल या वर्तमानपत्रात जाहीर सुचना प्रसिध्द करून निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. तसेच महानगरपालिकेचे संकेतस्थळ www.mbmc.abcprocure.com यावर जाहिर निविदा सुचना प्रसिध्द करून निविदा मागविलेल्या होत्या. या अनुषंगे E-Tendering पध्दतीने फक्त एकच निविदा प्राप्त झालेली आहे. सदरहू निविदा प्रथमतः मागविलेली असून, एकच निविदा प्राप्त झाल्याने फेर

निविदा मागविण्यांत यांवेत. त्याचप्रमाणे सदरच्या निविदेत पे ॲड पार्क चालविण्याच्या कामाच्या अनुभवाची अट देण्यांत आलेली आहे. सदरहू पे ॲड पार्क ठेका पधअदतीने चालविणे कामी स्पर्धात्मक दराचा लाभ होणेकरिता अनुभवाची अट शिथील करावी. तसेच इतर अटीर्शतीचा फेर विचार करून नव्याने निविदा मागविण्याची कार्यवाही करणेत यावी.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा अनुमोदक :- श्री. शशिकांत भोईर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २१, महानगरपालिका पदाधिकारी व अधिकारी यांचे वाहनभत्त्यामध्ये वाढ करणे.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब, या विषयाचा गोषवारा आलेला नाही आणि कोणते अधिकारी आहेत?

**भगवती शर्मा :-**

कशासाठी वाढ?

**शशिकांत भोईर :-**

वाहन भत्ता.

**भगवती शर्मा :-**

वाहन भत्ता कशासाठी? त्याचे वाहन कमी करा. ठाण्याला एक मिनीबस ठेवा.

**लक्ष्मण जंगम :-**

सन्मा. सदस्य भगवती शर्मा साहेब, पहिली माहिती तरी घ्या. कोणाकोणाला पाहिजे? नेमके कोण अधिकारी आहेत? किती आहेत? ज्याला ट्रॅवलिंग जास्त करायचं असेल, धावपळ करायची आहे त्याला वाहन द्यायला लागत असेल अस कसं? काय बंद ठेवणार आहे का? जर आपल्या सर्वांना वाटत असेल की, त्या अधिकाऱ्याची खुप धावपळ आहे तर त्या अधिकाऱ्याला द्यायला लागेल ना आणि आता पावसाशी लढाईचे दिवस जवळ आलेले आहे ना.

**दादासाहेब पाटील (मु.ले.प.) :-**

पदाधिकारी, अधिकारी आहेत त्यांना वाहन द्यायला लागतात ना.

**शशिकांत भोईर :-**

अधिकारी पण आहे ना पदाधिकारी म्हणजे कोण?

**दादासाहेब पाटील (मु.ले.प.) :-**

मा. महापौर, मा. उपमहापौर, स्थायी समिती सभापती, प्रभाग समिती सभापती.......

**भगवती शर्मा :-**

अपुन ऐसे ही आस्थापना ने खर्चा कम करने की सोचते है और इधर.......

**स्नेहा पांडे :-**

बारीश मे पानी भरेगा तो इनका नंबर नही लगता है। कौनसा अधिकारी नंबर उठाते है?

**मा. आयुक्त :-**

जो कोई फोन नही उठाता है उनका नाम ले लो।

**स्नेहा पांडे :-**

जनरल की बात नही, बारीश के टाईम पर कोई फोन नही उठाते है।

**मा. आयुक्त :-**

जिन्होंने फोन नही उठाया है उनका नाम और नंबर दे दो। अभी हम ॲक्शन लेंगे।

**दादासाहेब पाटील (मु.ले.प.) :-**

सन्मा. सभापती महोदय आणि सन्मा. सदस्य त्याच्यामध्ये पदाधिकारी जे आहेत ते मा. महापौर साहेब, उपमहापौर साहेब, स्थायी समिती सभापती, प्रभाग समितीचे सर्व सभापती शिक्षण मंडळाचे सभापती, वृक्ष प्राधिकरण आणि इतर ज्याकाही समित्या असतील त्या सर्व पदाधिकारी आहेत आणि महापालिकेने काही अधिकाऱ्यांना भत्ता दिलेला आहे आणि काही अधिकाऱ्यांना गाड्या दिलेल्या आहेत.

**शशिकांत भोईर :-**

काही अधिकारी कोण कोण ते पण सांगा ना.

**मा. आयुक्त :-**

यादी द्या.

**दादासाहेब पाटील (मु.ले.प.) :-**

अधिकाऱ्यांची यादी वाचू काय?

**दिनेश नलावडे :-**

पाटील साहेब, आपल्याकडे याबाबतीत कोणाचा प्रस्ताव आलेला आहे का?

**दादासाहेब पाटील (मु.ले.प.) :-**

याच्यामध्ये मागच्या वेळेला बजेटमध्ये अशी चर्चा झाली होती की, आपण भाड्याने गाड्या घेतलेल्या आहेत त्या गाड्याना आपण ३३ हजार रुपये देतो आणि आता आपल्याकडे महिला बालकल्याण सभापती यांना १७,००० रुपये देतो उपसभापती.

**मा. आयुक्त :-**

पाटील साहेब, २२ ते २५ यामध्ये आहेत. ३३ हजार नाही मिनिमम २२ हजार रुपये आहे मला माहित आहे.

**दादासाहेब पाटील (मु.ले.प.) :-**

साहेब, मॅक्सीमम बिल २५ च्या खाली नाही.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही ३३ हजार रुपये बोलले ना?

**दादासाहेब पाटील (मु.ले.प.) :-**

३३ हजार रुपये आपण मंजूर केले ना. आता स्थायी समितीने ठराव केला आणि त्याच्यामध्ये जर वाहनाचा खर्च काढला वाहनाचा घसळा, त्याची घेतलेली किंमत, त्याच्यावर पेट्रोल, डिसेलचा होणारा खर्च वाहन चालकाचा पगार याचा एकत्रित जर विचार केला. महापालिकेच्या गाडीला कमीत कमी ३५ हजार रुपये खर्च येतो आणि भाड्याच्या गाडीला २२ ते ३३ हजार रुपये दरम्यान खर्च आहे तो आपण confirm करुन सांगतो आपण आता पदाधिका-यांना १७ हजार रुपये देतो आणि काही अधिका-यांना १० हजार रुपये देतो.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, ज्यावेळी बजट होत त्यावेळी मी चर्चा केली होती की, सरसकट १७ हजार रुपये द्यावे आणि अधिकारी स्वतःची गाडी वापरतील गाडी १० वर्षाने निर्लिखित होते. कोण-कोण अधिकारी आहेत त्याची मला लिस्ट द्या. अधिकारी कोण आहेत त्यांची मला लिस्ट द्या अधिकारी कोण आहेत ते माहित पडले पाहिजे ना.

**दादासाहेब पाटील (मु.ले.प.) :-**

मी आपल्या अधिका-यांची यादी वाचतो. मा. आयुक्त सो. मा. उपायुक्त (मु.) सो, आता ज्या गाड्या महापालिकेचे आहेत त्याची यादी वाचून दाखवतो नंतर जे वाहन भत्ता घेतात त्याची यादी वाचून दाखवतो शहर अभियंता, मुख्यलेखाधिकारी, कर निर्धारक व संकलक आणि कार्यकारी अभियंता, कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा शिक्षण अधिकारी प्रभाग समिती क्र.१ उद्यान अधिक्षक २,उद्यान अधिक्षक १ यांना आपण महापालिकेची गाडी पुरवलेले आहे आणि महापालिकेकडून ज्याला १० हजार रुपये भत्ता मिळतो ते आहेत नगरसचिव, उपअभियंता पाणी पुरवठा उपअभियंता सार्वजनिक बांधकाम नितिश मुकणे, उपअभियंता हेमचंद्र किणी, उपअभियंता सुरेश वाकोडे, उपअभियंता किरण राठोड, उपअभियंता निकम, वैद्यकीय अधिकारी चंद्रशेखर कांबळे, वैद्यकीय अधिकारी प्रमोद पडवळ, वैद्यकीय अधिकारी वंदना पाटील, वैद्यकीय अधिकारी अरविंद काकडे, वैद्यकीय अधिकारी नंदकिशोर लहाने एवढ्या लोकांना आपण १० हजार भत्ता देतो.

**मा. आयुक्त :-**

हे त्यांच्या स्वतःच्या गाड्या आहेत.

**दादासाहेब पाटील (मु.ले.प.) :-**

त्यांच्या स्वतःच्या गाड्या आहेत.

**शशिकांत भोईर :-**

वैद्यकीय अधिका-यांमध्ये आपल्याच पालिकेत देतात की, अन्य पालिकेमध्ये देतात त्याची पण विचारणा कराना. वैद्यकीय अधिकारी कुठे-कुठे फिरतात त्यांना तर कुठे जायला फिरता दवाखाना आहे. मग ते वैद्यकीय अधिकारी कोणत्या क्लास मध्ये मोडतात.

**दादासाहेब पाटील (मु.ले.प.) :-**

आता आपल्या महापालिकेने कोणाला गाड्या देऊ आणि कोणाला गाड्या देऊ नये. अशा पध्दतीने कुठलेही धोरण ठरवलेलं नाही. मा. महासभेने धोरण ठरवलं पाहिजे की, कोणाला गाडी द्यायची आणि कोणाला गाडी नाही द्यायची.

**भगवती शर्मा :-**

पाटील साहब, आपको एक बात बताता हूँ। आपने यह विषय लाया इसमे किसीका अभ्यास नही है। इसको पूरे अभ्यास और गोषवारा के साथ लाइऐ। इसिकेलिए मा. महासभा मे हम लोगों ने ठराव किया था। गटनेताओं को गाडी देने का आपने कुछ बील भी बनाये थे। लेकीन बादमे यह हुआ की, महापालिकापे आर्थिक बोजा ज्यादा पड रहा है। बिल बनाये हुए कॅन्सल किये और इधर आप वापस विषय ला रहे है।

**मा. आयुक्त :-**

सब स्टाफ को बोलो।

**भगवती शर्मा :-**

किसका फिल्डवर्क क्या है? इतने अधिकारी है कौनसे फिल्ड वर्क के अंदर घुमते है वह मुझे बतोओ। इसे अच्छा इसपे पुर्ण अभ्यास करके वापर यह विषय लाओ।

**दादासाहेब पाटील (मु.ले.प.) :-**

यह सब्जेक्ट प्रशासनमे नही दिया है।

**लक्ष्मण जंगम :-**

तुम्ही असं करा विषय परत आणताना हे सुध्दा बघा की, मागच्या कार्यकालामध्ये तुम्ही आता किरण राठोडच नाव वाचलं मागच्या याच ठिकाणी स्टँडींगमध्ये जी मिटींग घेतली होती त्याच्यामध्ये १ करोड ७५ लाख रुपये बॅलेंस ठेवणार अधिकारी मला वाटतं त्यांना पहिलं वाढवून दिलं पाहिजे कारण त्यांनी जोरात काम केलं. यांना गाड्या देऊन काय करणार आहे.

**शशिकांत भोईर :-**

मा. आयुक्त साहेब, आपण ह्याच्यामध्ये अर्थसंकल्पामध्ये लाख रुपये तरतुद पण केलेली आहे. ती वसुली बाबतीत काय आहे. त्यांनी तर डायरेक्ट बोलले की, आम्ही कर विभागाकडे सुपुर्त केलेलं आहे. करविभाग वसुली करणार की तोडणारे वसुली करणार?

**मा. आयुक्त :-**

विजय पाटील साहेब, आपल्याला प्रॉपर्टी टॅक्स मध्ये ॲड करुन पाठवायला सांगितलं होत तर ते पाठवलं का? २ वर्षे झाली तुम्हाला सांगतो. २ वर्षापासुन सांगतो की, कुठलही महापालिकेचं येणं असेल तर ते बिल प्रिंट काढायचं त्याच्याखाली हस्ताक्षरात लिहा की, उजव्या इमारतीच्या तोडलेल्या बांधकामाचं करत नाही. तुम्हाला अडचण काय आहे ते सांगा.

**विजय पाटील :-**

साहेब, या वर्षाची बिलं आम्हाला आता मिळालेली आहे.

**भगवती शर्मा :-**

जबाबदार कोण?

**शशिकांत भोईर :-**

त्यांनी सांगितलं प्रत्येक वर्षी दिलेलं आहे आणि टॅक्स विभागाने वसुली करायची आहे.

**मा. आयुक्त :-**

ती सुध्दा ॲड करुन पाठवलेली आहे की नाही .

**विजय पाटील :-**

नाही.

**शशिकांत भोईर :-**

मा. आयुक्त साहेब, त्याकरीताच आम्ही सांगतो की, ह्या ठरावाचं काय झालं त्यासाठी विचारायला लागते ठराव इम्प्लिमेंट नक्की झालं का? त्याची अंमलबजावणी झाली की नाही? गेल्यावेळी आपण मोबाईल पण पास केलं एअरटेलचं कार्ड घ्यायचं की, वोडाफोन घ्यायचा. तोही निर्णय अद्यापपर्यंत घेतला नाही. आता पावसाळा आला त्यामुळे प्रत्येक अधिकाऱ्यांशी संपर्क साधायला लागेल. रिलायन्स ची रेंज बरोबर मिळत नाही.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही बिलामध्ये ॲड करुन पाठवलं की नाही?

**विजय पाटील :-**

नाही.

**मा. आयुक्त :-**

का नाही पाठवलं?

**शशिकांत भोईर :-**

साहेब, येणे टॅक्स घेताना तलाठीचा तिकडून धारा भरायचा असतो ते लिहून देतात आणि प्रत्येक सोसायटी भरते ही.

**भगवती शर्मा :-**

आज बिल्डर कौन है? कौन गया, वह चला गया? आज वब फ्लॅटवाले क्यो भरेंगे? इसलिए उस बिल्डर को भी नोटीस दे दो। क्योकी बिल्डर कहिना कही कंन्स्ट्रक्शन करता होगा। अब उसका दंड कौन भोगेगा। रहनेवाले तो कल वह आपके पास आयेंगे, हमारे पास आयेंगे।

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य भगवती शर्मा साहब, वह बिल्डर के नाम पर ही बिल है। वह जहा रहता है। उसको प्रॉपर्टी मे ॲड करनेका।

**भगवती शर्मा :-**

हा वैसा ही किया जाये।

**शशिकांत भोईर :-**

रिलायन्स मोबाईलच रेंज पकडत नाही. त्यासाठी एअरटेल किंवा वोडाफोन तर आपण वोडाफोनला प्रपोज केलेला लवकर करा म्हणून सांगितलेले तर अजून पर्यंत काहीच झालेल नाही.

**मा. सभापती :-**

सही झाली ना.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. आयुक्त साहेब १ करोड ७५ लाख रू. बॅलेन्स राहिले. २-३ वर्षापासून पाठवले नाही. आपले एक करोड आहेत. तेवढे १ करोड ७५ लाख रू. च पाठवणार आहोत. याच्यामध्ये १ करोड ७५ लाख रू. आपल्याकडे अमाऊंट बॅलेन्स आहे. आपण गेल्या ३-४ वर्षापासून किंवा १० वर्षाच असेल तेव्हापासून आपली जी मुद्दल रक्कम आहे. तीच आपण पाठवणार होतो. त्याला

**मा. आयुक्त :-**

१२ टक्के व्याज लावलेले आहे. फक्त आपली एवढीच अडचण होती, आता समजा ५० झोपड्या तोडल्या, १०० झोपड्या तोडल्या. ते झोपड्या बांधतात. पुन्हा बांबु लावतात. किंवा पत्रे लावतात. त्यामध्ये त्यांना बिल पाठवायला अडचण होते. कारण, त्यांच्याकडे राहण्यासाठी दुसर घरच नाही. फक्त हे बिल्डर जे अनऑथरॉइज बांधतात त्यामध्ये आपल्याला बिल पाठवता येईल.

**दिनेश नलावडे :-**

मा. सभापती साहेब, चौपाटीला भाडे वाढवण्याचा प्रस्ताव जो आलेला आहे. आणि आपण या ठिकाणी मंजूर पण केलेला आहे.

**मा. आयुक्त :-**

तर, हा विषय होता. भाड वाढ कमी करायच की जास्त करायच याबाबत निर्णय घ्यावे. म्हणून मा. महासभेपुढे पॉलिसी मॅटर डिसाईड करायला पाठवल.

**भगवती शर्मा :-**

साहब, मा. महासभा मे आप भेजेंगे वह आपका अधिकार है। मा. महासभा मंजूर करे नही करे वह ठिक है। लेकिन मुझे यह बताइए सचिव साहब है, और पाटील साहब बैठे है। स्थायी समितीका कोई भी ठराव किया हुआ है। उसको रोक कोन लगा सकता है? मा. महापौर साहब, लगा सकते है, मा. आयुक्त साहब लगा सकते है? क्योकी मैने जहॉतक सुना है उस ठराव की अंमलबजावणी पर रोक लगाई है। जबतक मा. महासभा निर्णय नही लेगी तबतक। लेकिन ऐसा निर्णय लेनेके लिए सक्षम अधिकारी कौन है? सचिव साहब आप बताइए। ऐसा कुछ है क्या।

**मा. आयुक्त :-**

रोका नही है। ते फक्त मा. महासभेने धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी पाठवलेल आहे.

**भगवती शर्मा :-**

लेकिन आपने उसके साथमे यह दिया है की, उस ठराव की अंमलबजावणी करो।

**मा. आयुक्त :-**

जबतक मा. महासभा डिसाईड नही करेंगी तबतक।

**भगवती शर्मा :-**

सचिव साहब, ऐसा आप हमको ऑन रेकॉर्ड मे बातइए की, कौनसे नियम है?

**नगरसचिव :-**

साहब ने बताया ना की, रोका नही है।

**भगवती शर्मा :-**

साहब, रोका हुआ है। उस ठराव की अंमलबजावणी रोकी हुई है। ऐसा हो सकता है क्या?

**मा. आयुक्त :-**

मा. महासभामें मैने गोषवारा दिया है वह पढो। गोषवारा मे मैने ऐसा ही वर्ड युज किया है की, अमाऊंट डिसाईड करनेके लिए स्टॅण्डींग कमिटीमे भेजा था। उसके बारे मे अदर सबजेक्ट नही था। यह डिसाईड इन्होने स्टॅण्डींग ने किया और धोरणात्मक सबजेक्ट के बारेमे आप डिसाईड करो। बादमे इसका इम्पीलीमेंट करेंगे।

**भगवती शर्मा :-**

बादमे करेंगे।

**मा. आयुक्त :-**

जो होगा वह।

**शशिकांत भोईर :-**

त्यासाठी मी बोललो की, धोरणात्मक निर्णय आहे ना. तर मा. महासभेमध्ये पाठवा.

**मा. आयुक्त :-**

दुसरी विचारणा केली तर परत म्हणणार की कशाला पाठवल?

**शशिकांत भोईर :-**

धोरणात्मक निर्णय स्टॅण्डिंगला घ्यायचा नसतो. तो निर्णय मा. महासभेमध्ये घ्यायला पाहिजे.

**भगवती शर्मा :-**

निर्णय तम्ही ४५१ खाली घ्या.

**मा. आयुक्त :-**

मी शिफारस केलेली आहे की, मा. महासभाने काय तो निर्णय घ्यावा म्हणून. जर मी ४५१ लावल असत तर परत तुम्ही म्हटंल असत की, तुम्ही आम्हाला अस वागवल म्हणुन. म्हणून मी धोरणात्मक निर्णय घ्या अस केलेले आहे.

**भगवती शर्मा :-**

साहेब, तुम्ही ४५१ प्रमाणे कारवाई करा.

**मा. आयुक्त :-**

केली तर ते रद्द करायला जाईल.

**भगवती शर्मा :-**

तुम्ही त्या पत्रामध्ये काय सांगितल की, सदर विषय धोरणात्मक असल्यामुळे मा. महासभेत सादर करण्यात येईल. आणि मा. महासभेने योग्य निर्णय़ घेतल्यास सदर ठरावाची अंमलबजावणी करता येईल. म्हणजे तिथपर्यंत त्या ठरावाची अंमलबजावणी नाही होणार. तुम्ही ४५१ खाली गेले ना.

**लक्ष्मण जंगम :-**

म्हणजे तुम्ही त्याला स्टे दिला. हे सिध्द होते.

**भगवती शर्मा :-**

ते देवू शकत नाही.

**लक्ष्मण जंगम :-**

तो पर्यंत म्हणजे याचा अर्थ स्टे.

**मा. आयुक्त :-**

तो पर्यंत नाही. होईपर्यंत.

**लक्ष्मण जंगम :-**

म्हणजे तो पिरेड. त्या पिरेड पर्यंत तुम्ही ॲझ इट इझ ठेवा म्हणजेच स्टे.

**भगवती शर्मा :-**

सचिव साहब, आप बताइए, प्रशासन के कामकाज का निर्णय यह लिया वह सही है। वह हमको बताइए। फिर उसके बादमे देखेंगे।

**दिनेश नलावडे :-**

सन्मा. सदस्य भगवती शर्माजी, आप सचिव साहब को बोलते है की सही है की गलत है? कमिशनर साहब के विरोध मे सचिव साहब कैसे जायेंगे।

**भगवती शर्मा :-**

कोई भी सभा जैसे मा. महासभा स्थायी समिती सभा यह मेन सभा होती है। और उसमे मुख्य भुमिका सचिव साहब की ही होती है। सचिव अपना स्टेटमेंट ऑन रेकॉर्ड मे दे। हे नियममध्ये आहे का? सचिव साहेब सांगा.

**नगरसचिव :-**

कमिशनर साहब ने रोक नही लगाई है।

**भगवती शर्मा :-**

सचिव साहब का यह कहाना है की, रोक नही लगाई है। यह ऑन रेकॉर्ड मे लो। सचिव साहब का स्टेटमेंट नोट किया जाये। सचिव साहब ने यह कहा है की, कमिशनर साहब ने कोई रोक नही लगाई है।

**मा. आयुक्त :-**

रोक नहीं लगाया है। बस मा. महासभा के डिसीजन के लिए भेजा हूँ। डिसीजन के बाद अंमलबजावणी नही करूंगा।

**भगवती शर्मा :-**

तबतक रोक नही है। यह हो गया था अंमलबजावणी। तो यह तो नियम मे नही है ना। सचिव साहब आप बताइए।

**मा. आयुक्त :-**

कॅपेसिटी मे वब सबजेक्ट है। वह कॅपेसिटी के पास भेजा।

**भगवती शर्मा :-**

सचिव साहब ऑन रेकॉर्ड मे बताइए। हम प्रशासन के पास जायेंगे।

**शशिकांत भोईर :-**

त्यावेळी तुम्ही बोलले होते की हे स्टॅण्डींगलाच पाठवायच होत. मी त्याच्यावर वक्तव्य पण केले.

**मा. आयुक्त :-**

मी माईकवर सांगितल की, अस करता येणार नाही. दर कमी जास्त करायचे की नाही?

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर साहेबांनी रूलिंग दिलेल की संपूर्ण सविस्तर माहिती जेवढी मैदाने आहेत ते सगळ गोषवाऱ्यानिशी यायच. आणि ते मा. महासभेला आणायच. तुम्ही तरी पण स्टॅण्डिंग मध्ये आणल ते चुकीच केल. स्टॅण्डिंगला आणायलाच नाही पाहिजे.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. आयुक्त साहेब पहिला ठराव भाडेवाढीचा केला तो सुध्दा स्टॅण्डिंगने केला.

**दिपक खांबित :-**

दर कमी केल नाही. दर सेम ठेवल. फक्त मैदान द्यायच की बंद करायच. म्हणजे लोकांना वापरायला द्यायच की नाही.

**लक्ष्मण जंगम :-**

अगोदर जे कमी दर होते. भाडे आणि डिपॉझीट जे कमी होते ते वाढवल सुध्दा अगोदरच्या स्टॅण्डिंगमध्ये. परत ते कमी करायचे की, ॲज इट इझ ठेवायच की, वाढवयचे याच्यासाठी परत विषय आणला. पहिल्या स्टॅण्डिंगने केलेल्या निर्णयाची जर अंमलबजावणी झाली नाही. तर तुम्ही याच्यामध्ये कसे काय थांबवता? पहिला ठराव झाला त्याची अंमलबजावणी झाली. आणि परत जो ठराव झाला त्यावेळेला कशी काय अडचण आली. दोन्ही वेळचे स्टॅण्डिंगचे ठराव आहे.

**दिपक खांबित :-**

मा. महासभेत आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

मागच्या वेळेला आपली चर्चा काय झाली की, त्या ठिकाणी सतत कुठलेही बाकिचे कार्यक्रम करत असतात. ओपन मैदानात. आपल्या चौपाटीचा काय प्रपोजल आहे. लोकांना फिरण्यासाठी. म्हणून आपण त्याच्यासाठी वापरावे. आणि धार्मिक कार्यक्रम गणपती, नवरात्री, बाकी सगळे होवू द्या अशा पध्दतीने आपण ठरावामध्ये म्हंटल आहे.

**शशिकांत भोईर :-**

मोकळे मैदान विषयी असे सांगितल की, त्यांना सगळे कार्यक्रम करायला देत जा. म्हणजे लोकांची दिशाभुल करण्याचा प्रयत्न केला. ठराव करताना आपण तसा केला आहे. तुम्ही रेकॉर्ड वर आणा ते.

**दिपक खांबित :-**

मा. महासभेपुढे घेवून.........

**भगवती शर्मा :-**

तस कस? स्थायी समिती काही नाही का? यांच्या निर्णयाची काही अंमलबजावणी नाही. म्हणजे काय लावतात.

**दिनेश नलावडे :-**

कमिशनर साहेब, कुठल्या नेत्याला कुठल्या मोर्चाला सामोरे गेलात आणि तिथे तुमच्यावर दबाव आला म्हणून आमच्या स्टॅण्डिंगचा निर्णय तुम्ही निलंबीत करतात का?

**मा. आयुक्त :-**

अस काही नाही.

**दिनेश नलावडे :-**

मग, आम्ही ज्यावेळेला इथे निर्णय घेतला त्याच वेळेला तुम्हाला हा निर्णय घ्यायचा होता.

**मा. आयुक्त :-**

तुम्हाला मी सांगितल. आजचा ठराव बंदच करू नका. फक्त दर कमी जास्तचा तेवढाच विचार करा. आणि तुम्हाला सुप्रिम कोर्टाचे जजमेन्ट आहे की, रात्र दिवस चालू असेल तर १० वाजता बंद करायच. आच्याकडे काही झाल की तक्रार करायला येताना. त्यावेळेला त्याचा कार्यक्रम १० च्या पुढे गेला तर पोलिस स्टेशनला तक्रार करता येतील. तुमच्या कार्यकर्त्यांना पाठवायच बंधन घालून, अटी घालून देता येत. ही पब्लिक प्रॉपर्टी आहे. टोटली बंद करण्यासाठी देणारच नाही.

**शशिकांत भोईर :-**

पब्लिक प्रॉपर्टी म्हणून लोकांना फिरण्यासाठी आणि मुल खेळतात त्यांच्यासाठी ठेवलेला.

**मा. आयुक्त :-**

खेळण्यासाठी एक बाजु आहे आणि दुसरी बाजु दुसऱ्यासाठी आहे. तुम्ही तिथे स्टेज बांधला. तुमच्या खर्चाने स्टेज बांधलेला आहे. तुमच्या म्हणजे पालिकेच्या खर्चाने बांधलेला आहे. आणि तो पार्ट वेगळा आहे. आणि आता तुमच्याकडे जो प्रश्न आला होता की, ५,०००/- रूपये केले ते कमी करा. आमचा सबजेक्ट काय होता कमी करायच की तेवढंच ठेवायच याबाबत निर्णयासाठी आल होत.

**दिनेश नलावडे :-**

जास्त करायचा निर्णय आला नव्हता.

**मा. आयुक्त :-**

आम्ही तुम्हाला फक्त निर्णयासाठी पाठवल होत. तुम्ही जास्त करू शकला असता. तेवढ पार्ट मी पाळल असत. नंतर ती जास्त केल असत तर तो पार्ट मी अंमलबजावणी केली असती.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, विषय होता तो धोरणात्मक होता.

**मा. आयुक्त :-**

धोरणात्मक विषय नव्हता.

**शशिकांत भोईर :-**

पैशाची बाजू आली ना. ते धोरणच ठरवायच. वाढवायच की कमी करायच. ते मा. महासभेतच पाठवायला पाहिजे होत. पहिला पण तो महासभेमध्येच प्रस्ताव आला होता.

**मा. आयुक्त :-**

पहिला कर आणि दर हा विषय असतो की, कर दर पहिला स्टॅण्डिंग कमिटी घेते. नंतर मा. महासभेपुढे शिफारस होतो.

**शशिकांत भोईर :-**

स्टॅण्डिंगने ५ हजार की १० हजार रू. चा निर्णय घेतला होता.

**मा. आयुक्त :-**

निर्णय झाला ना. आणि त्या ५,०००/- रूपये ची अंमलबजावणी पण केली.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. सभापती साहेब विषय असा आहे की, तुम्ही स्टॅण्डींग मध्ये तो विषय आणला.

**मा. आयुक्त :-**

आणला फक्त असे-असे लोकांचे अर्ज आलेले आहेत. तर तुम्ही कमी जास्त करायचा विचार केला तर करू शकता.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. आयुक्त साहेब, कोणाची तरी मागणी त्या विषयासाठी आहे म्हणून हा विषय आणला. स्टॅण्डींग मध्ये विषय आणण्याचा पाठचा उद्देश काय आहे. त्याला स्टॅण्डींगचा तो अधिकार आहे म्हणून आणता ना.

**मा. आयुक्त :-**

कर आणि दर ठरवण्याचा अधिकार........

**लक्ष्मण जंगम :-**

साहेब, तिथे कर आणि दर लावण्याचा प्रश्नच नाही आहे. चौपाटीला मुंबईमध्ये कुठेही कर दर लावत नाही. कुठल्या चौपाटीला कर दर लागत असेल पूर्ण महाराष्ट्रामध्ये आणि देशामध्ये तर........

**मा. आयुक्त :-**

५,०००/- दर पण तुम्हीच लावला ना. आतापर्यंत ५,०००/- रक्कम वसुली झाली ना.

**लक्ष्मण जंगम :-**

म्हणूनच वारंवार हा विषय निर्माण होतो. म्हणून आम्ही निर्णय घेतला. की, चौपाटी ज्या परपजसाठी आहे. त्या परपजसाठीच राहू द्या.

**मा. आयुक्त :-**

बहुतेक तुम्हाला २ वर्षानंतर सुचल. २ वर्षापर्यंत तुम्ही ५,०००/- रूपये घ्या. म्हंटल. ५,०००/-प्रमाणे पावत्या फाडल्या.

**भगवती शर्मा :-**

साहब, २ साल गलती किया। उसको सुधार नही सकते है।

**मा. आयुक्त :-**

सुधारो ना।

**भगवती शर्मा :-**

मै आपको एक प्रश्न पुछता हुं की, आप गोषवारा रितसर से दिजीए। उसमे महसुल का कलेक्टर का ऑर्डर ( महसुल/१/१ एलबीपी/अति संरक्षण/एसआर/४-२००० चा दि. ७/१०/२०१०) जिल्हाधिकारी का आदेश है। उसके अंदर क्या लिखा है की, आदेशानुसार अटीशर्तीच्या अधिन राहून महानगरपालिकाकडे सोपविले आहे. मतलब कलेक्टर ने आपको जो जगा दिया हुआ है। उसमे आपको जिस अटीशर्तीमे दिया हुआ है। उस अटीशर्ती के अनुसार आप किसिको भाडे पे दे सकते है क्या? पहले यह बता दिजीए। क्योकी आपने शुरू से जो भी निर्णय लिया हुआ है। फिर चाहे किसिने भी निर्णय लिया हो। मा. महासभाने लिया हो या स्टॅण्डींग ने लिया हो।

**मा. आयुक्त :-**

भाडे पे देनेका सबजेक्ट ही स्टॅण्डींग कमिटी ने लिया है।

**भगवती शर्मा :-**

साहब, अभी आप चर्चा कर रहे है ना। तो मे बोल रहा हूँ। उस आदेश के अनुसार इस चौपाटी को भाडे पे किसिको दे सकते है क्या?

**दिपक खांबीत :-**

कलेक्टर ने काय केल की, या सगळ्या सरकारी जमीन आहे ना. त्या आपल्याकडे हॅण्डओव्हर केल्या ना. ह्याच्यामध्ये फक्त वापर वैगेरे बदलू.

**लक्ष्मण जंगम :-**

तुम्ही त्याची देखभाल करा.

**भगवती शर्मा :-**

आप किसी प्रॉपर्टी को भाडे पे नही दे सकते.

**मा. आयुक्त :-**

पण, गार्डन करा म्हणून म्हंटलेल नाही.

**लक्ष्मण जंगम :-**

चौपाटी करा. कुठे म्हंटलेल आहे?

**मा. आयुक्त :-**

स्टेज करा पण म्हंटलेल नाही. जस आहे तस सांभाळा म्हणजे सगळच निघेल.

**लक्ष्मण जंगम :-**

जस आहे तसच सांभाळा. त्याच्यामध्ये ज्या परपजसाठी काही चेंजस केल तर ठिक आहे.

**मा. आयुक्त :-**

ठिक आहे. कलेक्टर साहेबांना विचारून घेवू. अस अस ह्यांनी ठराव केला आहे. फी घ्यायची की नाही? अस विचारू. म्हणजे सांभाळण्याच एवढच काम होत तर यावर करोडो रू. खर्च का केले?

**शशिकांत भोईर :-**

प्रशासनाने योग्य मार्गदर्शन न केल्यामुळे ती चुकी झाली.

**भगवती शर्मा :-**

बॉम्बे की कोई चौपाटी भाडे पे नही दी जाती।

**मा. आयुक्त :-**

फिर उधर चेंज ही नही करने का था।

**लक्ष्मण जंगम :-**

त्या अटी तुम्ही पहिल्या घालायला पाहिजे होत्या.

**भगवती शर्मा :-**

सुधार करून घ्या.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. सभापती साहेबाच्या कामासाठी चौपाटी आहे. तो निर्णय घेतला तर त्याच्यासाठी मा. आयुक्त साहेबांनी सांगितल की मा. महासभामध्ये जावू द्या. या शहरामध्ये असा विषय आहे की, चौपाटीचा वापर किती होणार आहे. त्याच्या पलिकडे जावुन काही अमुख लोकांना त्याच भांडवल जास्त करायच आहे. हा विषय महत्वाचा आहे. आणि उद्या स्टॅण्डींग मध्ये आम्ही केल. त्याच्यासाठी चार मोर्चे निघाले. उद्या मा. महासभेत घेवून परत दहा मोर्चे काढायचे का? आणि आठ अधिकाऱ्यांच काम वाढवायच का? तुम्ही याच ठिकाणी जो आपल्या अधिकाऱ्यामध्ये विषय संपवून टाकायचा. त्याला पुढे टोक लावत न्यायची काही गरज आहे का? साहेब, अस आहे की, हा विषय इथे संपणार आहे. मी काय म्हणतो की, त्या दिवशी स्थायी समितीने असा ठराव केला म्हणून मोर्चा आला. बरोबर आहे. उद्या मा. महासभेमध्ये हा विषय चुकीचा आहे म्हणून आम्ही जो ठराव इथे केला आहे तोच करणार आहोत. मग, परंतु ४ मोर्चे वाढवायचे का? साहेब, तुम्ही जी वस्तुस्थिती आहे किंवा खरं आहे. त्याच्यावर जावून तुम्ही विषय संपवला पाहिजे की नाही. तुम्ही त्याला पुढे वाटचाल करायला कसे जातात. तुमच काम वाढवता, आमच काम वाढवता. या शहरामध्ये कायदा आणि..........

**मा. आयुक्त :-**

म्हणुन वाढवायच नाही असाच निर्णय घ्यायचा ना.

**लक्ष्मण जंगम :-**

म्हणूनच ज्या परपजसाठी आल होत त्या........

**मा. आयुक्त :-**

ज्या परपजसाठी विषय आला होता. तेवढच करायच होत त्याच्यावर वाढीव करायच नाही.

**लक्ष्मण जंगम :-**

तुम्हाला मी म्हणतो की, तुम्हाला जर हे अयोग्य वाटत असेल तर खरोखर तुम्ही ४५१ खाली पाठवा. तिकडुन जर कॅन्सल होवून आला तर आम्हाला काही म्हणायच नाही. मा. महासभेमध्ये हे विषय घेवून परत याशहरामध्ये मोर्चे काढायचे का? अमुख लोकांना एवढ आहे की, आम्ही त्या ठरावामध्ये स्पष्ट म्हंटलेल आहे की, धार्मिक सण जसे गणपती, नवरात्री, छटपुजा हे सगळ विषय. पण लोक मोर्चा काढणार काय म्हणतात

की, या शहरामध्ये की, या शहरामध्ये धार्मिक भावना दुखावल्या. शहरामध्ये त्याचा बी फॉर यस करायची गरज नाही.

**मा. आयुक्त :-**

या कारणाशी आमचा संबंध नाही.

**लक्ष्मण जंगम :-**

तुमचा संबंध नाही तर मग, संबंध लागतो कुठे? मा. सभापती साहेब, हे अस केल्यामुळे पुढे राजकारणाशी संबंध लागतो की नाही. तुम्ही नाही म्हंणा सगळ्या सदस्यांनी बोलावे.

**मा. आयुक्त :-**

आमचा संबंध प्रशासनाशी नाही.

**लक्ष्मण जंगम :-**

तुमचा नाही येत. पण, आमचा येतो ना.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही तसा ठराव करायला नको हवे होता..

**लक्ष्मण जंगम :-**

आमचा जो अधिकार आहे. आमच्या अधिकारामध्ये केलेल्या कामाला तुम्ही जर कुठे पूर्ण विराम न देता. वाढवल म्हणुन.......

**मा. आयुक्त :-**

तुमच्या उत्तराला मी जो प्रश्न विचारला होता त्याला उत्तर दिल. महापालिका काही अटीशर्ती घालू शकते. संध्याकाळी ६ ते १० करा. स्पिकर १० नंतर बंद करा. अशा अटीशर्तीवर प्रॉपर्टी नाही की ती द्यायच नाही. कारण तुम्ही तिथे स्टेज बांधला. तुम्ही पार्ट केल. गार्डनचा विभाग वेगळा केला नंतर हा विभाग वेगळा केला. म्हणजे तुम्हाला पाहिजे तस करणार आणि नको त्या वेळेला नको म्हणणार.

**लक्ष्मण जंगम :-**

साहेब, आज आपण विषयावर चर्चा करतो. चौपाटीचा परपज एवढा.......

**मा. आयुक्त :-**

चौपाटी एका बाजूला आणि गार्डन बनवल एका बाजूला.

**लक्ष्मण जंगम :-**

चौपाटी म्हणजे फिरण्यासाठी, मुला बाळांना खेळण्यासाठी कार्यक्रमासाठी कुठे चौपाटी आहे का सभापती साहेब तुम्ही सांगा.

**मा. सभापती :-**

नाही आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

मग, मला सांगा याच्या पाठीमागे जर काय झाले, आज आपल्याला काय करायच आहे. त्या मुद्दयावर आपण आलो आहोत. योग्य निर्णय आज झाला आहे. मग, पाठीमागे जावून पाठीमागचे परत घोडे पुढे घेण्यात काही अर्थ आहे का मला सांगा. साहेब, आज जो निर्णय झाला तो योग्य नसेल तर तुम्ही सांगा की, तुम्ही हे म्हणता ते योग्य नाही. आणि मग, आपण पुढच्या विषयाला सुरूवात करू.

**मा. आयुक्त :-**

मा. सभापती साहेब, यापूर्वी महापालिका किंवा स्टॅण्डींग कमिटी यामध्ये विषय येवून एक चौपाटीचा पार्ट वेगळा केलेला आहे. गार्डन वेगळ केलेल आहे. चौपाटी वेगळी केलेली आहे. आणि कार्यक्रमासाठी स्टेज बांधुन तो प्लॉट वेगळा केलेला आहे. आणि त्या फ्लॉट मध्ये लोक कार्यक्रम करतात. त्यांना फुकट कशाला सोडायच? साफसफाई होतील, केरकचरा पडतो. याच होत म्हणून ५,०००/- रूपये फी या स्टॅण्डींग कमिटीने २ वर्षापूर्वी वाढवली. त्याप्रमाणे फी ही वसुल केली. आणि आता ती चौपाटी नाही. ती सुध्दा चौपाटी आहे अस म्हणून परत त्या विषयाला कलाटणी द्यायच बरोबर नाही. कारण, तुम्ही तिथे स्टेज बांधलेला आहे. कार्यक्रम होत ते म्हंटलेल आहे. आणि प्रत्येक कार्यक्रमाला तुम्ही पैसे घ्या. दर दिवसा ५,०००/- रू. त्याप्रमाणे फी वसुली केलेली आहे. २ वर्षानंतर कार्यक्रमासाठी नाही ते चौपाटी फिरण्यासाठी आहे. अस नाही. तुम्ही ऑलरेडी २ वर्षामध्ये फी तिथे वसुल केलेली आहे.

**भगवती शर्मा :-**

परत, निर्णय बदलु शकतो?

**मा. आयुक्त :-**

बदला. आमच काही म्हणन नाही. मा. महासभेमध्ये पाठवा.

**भगवती शर्मा :-**

सचिव साहेब, आपने मेरे सवाल का जबाब नही दिया।

**नगरसचिव :-**

उन्होने रोक नही लगाया है?

**भगवती शर्मा :-**

आप बोलिए की उस ठराव पे कोई रोक नही है।

**नगरसचिव :-**

साहब ने क्लिअर किया है की, मैने रोक नही लगाया है।

**मा. आयुक्त :-**

म्हणूनच निर्णयासाठी मी मा. महासभेकडे पाठवल.

**लक्ष्मण जंगम :-**

तुम्ही आता विषय सांगितल ना. की, स्टेज बांधला, गार्डन केल. आणि अमुख चौपाटीच सोडल ते आपण आपल्या मताने केल. उद्या आपण आणखीन वेगळा पार्ट करू शकतो.

**मा. आयुक्त :-**

चुकीच असेल तर सगळ्यांना विचारून घ्या. मी बोलतो ते चूक असेल तर सगळ्यांना विचारून घ्या. आम्हाला डोळ्याने जे दिसत तेच बोललो. डोळ्याने दिसत नाही ते काही मी बोललो नाही. चौपाटी आणि फिरण्याची जागा गार्डन आणि अर्ध्या भागात लोक फिरतात. गार्डनवर येतात, चौपाटीत येतात. या भागात भिंत बांधुन किंवा इमारतीने वेगळा करून स्टेज बांधलेले आहे. स्टेज बांधल्यानंतर सगळे कार्यक्रम सुरू झाले. त्यावेळेला स्टॅण्डींग कमिटीने आणि प्रशासनाने विषय दिला की फुकट कार्यक्रम करतात तर, त्याच्यावर काहीतर पे आकारा म्हणून.

**लक्ष्मण जंगम:-**

साहेब, त्यामध्ये एक सिंपल विषय आहे. चौपाटी आहे. एवढ १०० टक्के चौपाटीचा आपण वेगवेगळ्या कामांसाठी उपयोग केला. जस जस सवलती नुसार मिळत गेल तस-तस करत गेलो. पण, आता फिरवून आल्यावर चौपाटी आहे. एवढ निश्चित ना. तिथे आपण गार्डन बनवल. तिथे गार्डनच आरक्षण आहे?

**मा. आयुक्त :-**

नाही.

**लक्ष्मण जंगम :-**

स्टेज बांधता ते काय वेगळ मैदानाच आरक्षण आहे का? काही नाही ना. चौपाटी आहे एवढ १०० टक्के ना. मग, चौपाटी आहे चौपाटीसाठी राहु द्या. सगळाच विषय संपतो. तोच विषय आपण म्हणतो. तर, गार्डन हे ते पाठीमागे जाण्याची आपल्याला गरज नाही.

**मा. सभापती :-**

सदरचा विषय तहकुब करण्यात येत आहे.

(सदरचा विषय मा. सभापती यांच्या आदेशाने तहकुब करण्यात आला.)

**मा. सभापती :-**

आजची सभा संपली असे मी जाहिर करतो.

**सभा संपल्याची वेळ - दु. १.१५ वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**